


परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 94 | मंगळवार दि. 28 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# देशासह महाराष्ट्रात उष्णतेची लाट

## अनेक जिल्ह्यातील पारा 40 अंश सेल्सिअसच्या पलिकडे



मुंबई : राज्यात पूर्व मोसमी पावसाचा प्रभाव कमी होताच उष्णतेची मोठी लाट आली असून तापमानात झपाट्याने वाढ झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सूर्य आग ओकत आहे. उन्हाच्या तडाख्यामुळे महाराष्ट्र चांगलाच होरपळून निघाला आहे. रविवारी राज्यातील अनेक जिल्ह्यातील पारा 40 अंश सेल्सिअसच्या पलिकडे पोहोचला होता. विदर्भ आणि मराठवाड्यातील जनतेला उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला. तसेच, पुढील तीन दिवस महाराष्ट्रात अशीच उष्णतेची लाट पाहायला मिळणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे.

हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार, सोमवारी (27 एप्रिल) राज्यातील अकोला, अमरावती, वर्धा जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, बुलढाणा, नागपूर,



बुलडाणा, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्येही सतर्कतेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

उर्वरित ...राज्यात ...गाळ

वातावरण राहण्याची तसेच उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान, रविवारी (26 एप्रिल) अकोल्यामध्ये या मोसमातील रेकॉर्डब्रेक 46.9 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. या दोन्ही विभागासह पश्चिम, उत्तर आणि मध्य महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये पारा 40 अंश सेल्सिअसच्या पुढेच होता. भारतीय हवामान खात्याने राज्यात उष्णतेच्या लाटेचा हायअलर्ट जारी केला होता. उन्हाच्या कडाक्याचा दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम होताना दिसत आहे. शहरात ऐन पान 3 वर

# बॉलिवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्याचे 86 व्या वर्षी निधन

## 4 दशकांपेक्षा जास्त कारकीर्द




बॉलिवूडमधून अत्यंत दु:खद बातमी समोर आली आहे. अनेक चित्रपट आणि टीव्ही शोमध्ये काम केलेले ज्येष्ठ अभिनेते भरत कपूर यांचे निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या 86 व्या वर्षी त्यांच्या घरी अखेरचा श्वास घेतला. सोमवारी वयोमानाशी संबंधित समस्यांमुळे त्यांचे निधन झाले. अभिनेते अवतार गिल यांनी भरत कपूर यांच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला. भरत कपूर यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे. अभिनेते अवतार गिल यांनी सांगितले की, भरत कपूर यांच्या मुलाचा मला फोन आला होता. त्याने सांगितले की भरत गेल्या तीन दिवसांपासून अस्वस्थ होते आणि घरीच होते. त्याआधी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. निधनानंतर आज सायन रुग्णालयाजवळील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आता 30 एप्रिल रोजी सायन रुग्णालयाजवळील भाऊ दाजी मार्गावरील पान 3 वर

# आज ठळक

## उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन

### मार्गदर्शक सूचना जारी



बीड , दि; 26 ,(जिमाका ) उन्हाळ्यात तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

- **सुरक्षेचे उपाययोजना**




तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी ओआरएस (ORS), लस्सी, लिंबू पाणी, ताक आणि कैरीचे पन्हे यांसारख्या घरगुती पेयांचा वापर करावा.

बाहेर पडताना हलके, पातळ आणि सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी किंवा ओल्या कापडाचा वापर करावा. दुपारी 12 ते 3 या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे. कष्टाची कामे पहाटेच्या वेळी उरकून घ्यावीत आणि कामाच्या ठिकाणी मध्ये-मध्ये विश्रांती घ्यावी.घर थंड ठेवण्यासाठी पडदे आणि सनशेडचा वापर करावा. रात्रीच्या वेळी खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पाळीव प्राणी आणि गुरांना छावणीत ठेवावे व त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी द्यावे.

चक्कर येणे, सतत घाम येणे, डोकेदुखी किंवा अशक्तपणा जाणवल्यास ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशा वेळी तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

- **सावधगिरीच्या सूचना**




चहा, कॉफी, दारु आणि कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या पार्क केलेल्या वाहनात सोडू नका. तापमान जास्त असताना कष्टाची कामे टाळावीत. उन्हाच्या तीव्र कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे आणि पान 3 वर

# बाबासाहेबांनी देशातील पाणी समाजाच्या मालकीचे केले - उत्तम कांबळे




परळी प्रतिनिधी. या देशातील व्यवस्थेने ज्याला पाण्याला स्पर्श करु दिला जात नव्हता अशा अस्पृश्य समाजात जन्मलेले महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशाचे जलमंत्री झाले व भारताच्या पाण्याचे नियोजन केले . एवढेच नाही तर बाबासाहेबांनी देशातील पाणीच समाजाच्या मालकीचे केले असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार, साहित्यिक, विचारवंत व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी केले.ते परळी येथे विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श भीम जयंती महोत्सवात व्याख्यानप्रसंगी बोलत होते.

रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे हे होते.यावेळी पुढे बोलताना उत्तम कांबळे म्हणाले की, 1942 मध्ये व्हाईसरॉय मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर मंत्री झाले.मजूर मंत्री झाल्यानंतर बाबासाहेबांनी या देशातील कामगारांची पिळवणूक थांबवली. बारा ते सोळा घंटे काम करणाऱ्या मजुरांच्या कामाचे तास बाबासाहेबांनी 8 तासावर आणले .महिला व पुरुष कामगारांना समान वेतन, महिलांना प्रसूती पान 3 वर

## पस्तीस जणांचा बळी गेला तरी प्रशासन ढिम्म; माजलगाव-तेलगाव रस्ता बनला मृत्यूचा सापळा

# जिवाशी खेळ



माजलगाव: एका बाजूला विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा समृद्धीचा मार्ग, तर दुसरीकडे पस्तीस निष्पाप जीवांचा बळी घेणारा भेगांचा महामार्ग... माजलगाव ते तेलगाव या अवघ्या 20 किलोमीटरच्या प्रवासात आज मृत्यू पावलापावलावर दबा धरून बसला आहे.

गाडी वेगात असते, रस्ता चकचकीत दिसतो, पण अचानक डांबराच्या काळजाला पडलेली एखादी मोठी भेग समोर येते आणि क्षणार्धात चाक अडकून रक्ताचा सडा पडतो. घराकडे निघालेला पान 3 वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे बहुजन समाज सत्तेत -राजेश गित्ते





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- आज दिनांक 27/04/2026 रोजी मौजे बेलंबा तालुका परळी वैजनाथ येथे विशवरत्न, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण आणि बोद्ध विहारातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांच्या हस्ते करण्यात आले.

आपले मनोगत व्यक्त करताना राजेश गित्ते यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर पान 3 वर

# 15 व्या वित्त आयोगातून शहरातील आवश्यक त्या ठिकाणच्या सहा किलोमीटर पाईपलाईनच्या कामांना मंजुरी - नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी


### परळी वैजनाथ शहरातील 1 ते 17 प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाईप लाईनची कामे होणार

नगरपरिषद परळी वैजनाथ
नगरहितं मम कर्तव्यम्
स्थापना १९५२

परळी वैजनाथ: प्रतिनिधी.परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नगरपरिषदेने प्रस्तावित केलेल्या कामांना जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. 15 व्या वित्त आयोगाच्या बंधनकारक अनुदानातून एकूण 1 कोटी 96 लाख 95 हजार 639 रुपयांच्या निधीला ही मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे परळी वैजनाथ शहरातील प्रभाग क्रमांक एक ते सतरा या प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाणी पुरवठा पाईप लाईनची विस्तारीत कामे होणार आहेत. सर्व प्रभागांमध्ये मिळून एकूण सहा किलोमीटरची पाईपलाईनची कामे यामधून केली जाणार आहेत. अशी माहिती नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी पान 3 वर



# सोनाई कारखान्याचा 2700 रु प्रमाणे 16 फेब्रुवारी ते 10 मार्च 2026 पर्यंतचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा हप्ता महेश बँकेत वर्ग!



परळी वैजनाथ प्रतिनिधी सोनाई अँग्रो कारखान्याचे चेअरमन प्रा.टी.पी. मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचा 2700 रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता दिनांक 16 फेब्रुवारी ते 10 मार्च 2026 या कालावधीत कारखान्यास ऊस गेलेल्या शेतकऱ्यांचा ऊसाचा हप्ता महेश को-ऑपरेटिव्ह बँक शाखा परळी वैजनाथ येथे वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन आत्माराम कराड व संचालक प्रा. विजय मुंडे दिली आहे. सोनाई कारखान्याचा गळीत हंगामाचा शेवट दिनांक 10 मार्च रोजी झाला. सुरुवातीपासून ते कारखान्याचा गळीत हंगाम संपूर्ण होईपर्यंतची सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बिले कारखान्याने त्यांच्या खात्यात वर्ग केली आहेत.

त्यामुळे परिसरातील पान 3 वर

# सरस्वती नदीतील प्रस्तावित काँक्रीटीकरणामुळे अर्ध्या परळीवर भविष्यात जलसंकट

## धोकादायक काम त्वरित रद्द करण्यात यावे- अश्विन मोगरकर



परळी वैजनाथ सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट काँक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेकडे केली आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिर असलेल्या परळी शहरातील जुन्या गावभागातून वाहणारी सरस्वती नदी वैद्यनाथ मंदीरासमोरील स्मशानभूमी पासून, अंबेवेस, कृष्णा नगर, बरकत नगर मार्गे गंगाखेड रोडकडे नदीत मिसळते. सरस्वती नदीतून सर्वसाधारणपणे जून पासून जानेवारी पर्यंत सहा ते पान 3 वर

# सुवर्ण संधी : व्यापार विस्ताराला मिळणार मोठा वाव

### परळी नगर परिषदेच्या 54 पैकी 27 दुकानांचा होणार ई-लिलाव; 11 मे पर्यंत अर्ज करण्याची मुदत



परळी वैजनाथ: प्रतिनिधी

नगर परिषद परळी वैजनाथच्या मालकीच्या जागेत, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपुलाशेजारी नव्याने बांधण्यात आलेल्या व्यापारी संकुलातील 54 दुकाना पैकी पहिल्या टप्प्यातील 27 दुकानांचा ई-लिलाव जाहीर करण्यात आला आहे. इच्छुक संस्था आणि व्यक्तींना 11 मे 2026 पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत.शहरातील व्यापार विस्ताराला या व्यापारी संकुलामुळे मोठा वाव मिळणार असून इच्छुक व्यावसायिक व्यापाऱ्यांनी अधिकाधिक या लिलावात सहभागी भावे असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

नगर परिषदेने प्रसिद्ध केलेल्या निविदेनुसार, तळमजला आणि पहिल्या मजल्यावरील एकूण 54 गाळे भाडेतत्त्वावर देण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे.या पैकी पान 3 वर

## प्रवाशांना मिळणार सुखद प्रवासाचा नवा अनुभव; महाराष्ट्र दिनापासून एसटीची 'आपली बस, आपली सेवा'




पुणे: महाराष्ट्राची जीवनवाहिनी 'लालपरी' आता नव्या रुपात आणि नव्या उत्साहात प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांशी असलेले नाते अधिक घट्ट करण्यासाठी 'आपली बस, आपली सेवा' हे अभियान 1 मे 2026 पासून संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या पान 3 वर

# सत्ता कोणालाही सोडायची नाही

## प्राचार्य प्रकाश वाकळे, प्रा. शोभाताई घुंगरे-गवळे,डी. जी. राऊत यांच्या साहित्यकृतींचे प्रकाशन




सेलू (प्रतिनिधी): मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणाऱ्या तीन नवीन साहित्यकृतींचा भव्य ग्रंथ प्रकाशन सोहळा रविवारी, 26 एप्रिल 2026 रोजी सेलू येथील साई नाट्यगृहात उत्साहात पार पडला. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आणि समीक्षा पब्लिकेशन पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रा. शोभाताई घुंगरे -गवळे यांचा 'भाषाराणीचा दरबार' (बाल नाटिका संग्रह-प्रस्तावना डॉ. सिद्धार्थ तायडे), श्री. डी. जी. राऊत यांचा 'दारिद्र्याचा वणवा' (काव्यसंग्रह) आणि प्राचार्य प्रकाश वाकळे यांचा आयुष्याच्या वळणावर' (काव्यसंग्रह) या तीन पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. अनंत कराड होते, तर पुस्तकांचे प्रकाशन साहित्यिक प्रा. डॉ. संगीता घुगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रकाशित ग्रंथांवर ज्येष्ठ बाल साहित्यिक पु. ना. बारडकर, प्रा. शोभाताई घुंगरे आणि

प्रख्यात सिने-नाट्य लेखक दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केले.

या सोहळ्याला एकता फाउंडेशनचे सचिव गोकुळ पवार आणि प्रा. इम्रान शेख यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मेघा सुनील नांदखेडकर यांनी केले, तर प्राचार्य प्रकाश वाकळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्याला सेलू परिसरातील रसिक, साहित्यिक आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## बिर्याणीनंतर कलिंगड खाल्लं, मुंबईत एकाच कुटुंबातील 4 जणांचा मृत्यू



दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शनिवारी रात्री येथील एका कुटुंबात बिर्याणीची पार्टी झाली. त्यानंतर कुटुंबाने गोड पदार्थ म्हणून कलिंगड खाल्ले. त्यानंतर रविवारी सकाळी त्यांना त्रास होऊ लागला. तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. या घटनेत कुटुंबातील चार जणांचा एकमागून एक मृत्यू झाला. अन्नातील विषबाधेमुळे हे मृत्यू झाले, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. मोबाइल ॲक्सेसरीजचे दुकान चालवणारे अब्दुल्ला कादर (वय 40), त्यांची पत्नी नसरीन (वय 35), दोन मुली आयेशा (16) आणि झैनब (13) हे इतर पाच नातेवाईकांबरोबर शनिवारी रात्री मेजवाणीसाठी एकत्र आले होते. बिर्याणी खाल्ल्यानंतर ते पायधुनी येथील त्यांच्या घरी परतले.

रात्री घरी जाईपर्यंत त्यांना कोणतीही समस्या जाणवली नाही. घरी पोहोचल्यानंतर रात्री 1 वाजता कुटुंबातील सदस्यांनी कलिंगड खाल्ले. पहाटे 5 वाजता कुटुंबातील सदस्यांना अस्वस्थ वाटू लागले. उलट्या आणि अतिसारामुळे त्यांची प्रकृती खालावली. चौघांची अवस्था इतकी वाईट झाली की, त्यांना उठताही येत नव्हते.

शेजाऱ्यांना या गोष्टीची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्याच इमारतीत चौथ्या मजल्यावर राहत असलेल्या डॉ. कुरेशी यांना बोलावून घेतले. डॉक्टरांनी परिस्थिती पाहून प्राथमिक उपचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र परिस्थिती हाताबाहेर जात असल्यामुळे त्यांना जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लहान मुलगी झैनबचा रविवारी सकाळी 10:15 वाजता मृत्यू झाला. त्यानंतर आई नसरीन आणि मोठी मुलगी आयेशाही उपचारांना प्रतिसाद देत नव्हत्या. थोड्या वेळाने त्यांचाही मृत्यू झाला. रात्री 10.30 वाजता कुटुंबातील प्रमुख अब्दुल्ला यांचाही मृत्यू झाला.

**डॉ. भारत कऱ्हाड**



महाराष्ट्रासह देशातील राजकारणाचे बारकाईने निरीक्षण केले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—सत्ता ही केवळ शासन करण्याचे माध्यम राहिलेली नाही, तर ती प्रतिष्ठा, प्रभाव, नियंत्रण आणि अस्तित्व यांचे प्रतीक बनली आहे. म्हणूनच आजची राजकीय वास्तवता अशी आहे की, "सत्ता कोणालाही सोडायची नाही". ही मानसिकता केवळ विरोधी पक्षांपुरती मर्यादित नसून, सत्तेत असलेल्या मित्रपक्षांमध्येही ती तितक्याच तीव्रतेने दिसून येते.

राजकारणात विचारधारा, धोरणे आणि जनहित या गोष्टींचे महत्त्व नाकारता येत नाही; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात या गोष्टी अनेकदा सत्तेच्या समीकरणांपुढे दुय्यम ठरतात. निवडणुका जिंकण्यासाठी आणि सत्ता मिळवण्यासाठी पक्ष एकत्र येतात, युती करतात, तडजोडी करतात; पण एकदा सत्ता मिळाल्यानंतर त्याच मित्रपक्षांमध्ये स्पर्धा आणि संघर्ष सुरु होतो. कारण प्रत्येक पक्षाला आपला प्रभाव अधिक वाढवायचा असतो.

आजच्या राजकारणात "मित्रपक्ष" ही संकल्पना केवळ निवडणुकीपुरती मर्यादित राहिलेली दिसते. निवडणुकीत एकत्र लढणारे पक्ष सत्तेत आल्यानंतर अनेकदा एकमेकांविरोधातच भूमिका घेतात. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते राज्यस्तरापर्यंत हे चित्र दिसून येते. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद अशा विविध स्तरांवर सत्ताधारी पक्षांमध्येच संघर्ष होताना दिसतो. हे संघर्ष केवळ जागांच्या वाटपापुरते मर्यादित नसतात, तर प्रतिष्ठेच्या लढाईत परिवर्तित होतात.

या परिस्थितीमागे एक महत्त्वाचा घटक म्हणजे "राजकीय अस्तित्वाची भीती". कोणताही पक्ष किंवा नेता सत्तेबाहेर गेला की त्याचा प्रभाव कमी होतो, त्याची संघटनात्मक पकड सैल होते आणि पुढील निवडणुकांमध्ये त्याचे नुकसान होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे सत्ता टिकवून ठेवण्यासाठी कोणतीही तडजोड करण्याची तयारी दिसून येते. विचारसरणी बदलणे, पूर्वीच्या विरोधकांशी हातमिळवणी करणे किंवा सार्वजनिकरित्या एकमेकांवर टीका करत असतानाही सत्तेत एकत्र राहणे—हे सर्व याच मानसिकतेचे परिणाम आहेत.

इतिहासातही असे अनेक प्रसंग पाहायला मिळतात की, सत्ताधारी पक्षांमध्ये तीव्र मतभेद असूनही त्यांनी सत्ता टिकवण्यासाठी एकत्र राहणे पसंत केले. काही वेळा तर एकमेकांवर गंभीर आरोप-प्रत्यारोप होत असतानाही सत्तेची गाडी पुढे चालू ठेवली जाते. यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो की, खरे विरोधक कोण आणि खरे सहकारी कोण?

राजकीय नेत्यांसाठी सत्ता ही केवळ धोरणे राबवण्याचे साधन नसून, ती त्यांच्या राजकीय भवितव्याची हमी बनली आहे. सत्तेत असताना निर्णय घेण्याची ताकद, प्रशासनावर नियंत्रण, निधीचे वितरण आणि जनतेशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळते. त्यामुळे सत्ता गमावणे म्हणजे या सर्व गोष्टींवरचे नियंत्रण गमावणे होय. हीच भीती नेत्यांना सत्तेला चिकटून राहण्यास भाग पाडते.

युती सरकारांमध्ये ही समस्या अधिक प्रकर्षाने दिसते. दोन किंवा अधिक पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात तेव्हा सुरुवातीला समान कार्यक्रमावर सहमती दर्शवली जाते; पण कालांतराने प्रत्येक पक्ष आपल्या राजकीय फायद्याचा विचार करु लागतो. मंत्रीपदे, महत्त्वाची खात्यांची विभागणी, निर्णय प्रक्रियेत सहभाग—या सर्व बाबींमध्ये तणाव निर्माण होतो. हे तणाव अनेकदा सार्वजनिक पातळीवरही दिसू लागतात.

सध्याच्या राजकारणात माध्यमांची भूमिका देखील महत्त्वाची ठरते. माध्यमांमधून येणाऱ्या बातम्या, चर्चासत्रे आणि विश्लेषणे यामुळे या संघर्षांना अधिक प्रसिद्धी मिळते. त्यामुळे पक्षांवर दबाव वाढतो आणि ते अधिक आक्रमक भूमिका घेतात. काही वेळा हा संघर्ष केवळ प्रत्यक्ष नसून, तो प्रतिमा निर्माण करण्यासाठीही असतो. जनतेसमोर आपली भूमिका ठाम आहे, हे दाखवण्यासाठीही पक्ष एकमेकांवर टीका करतात.

परंतु या सगळ्या प्रक्रियेत सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, जनतेचे काय? सत्तेसाठी चाललेल्या या संघर्षात विकासाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष होते. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत गरजांपेक्षा राजकीय गणितांना अधिक महत्त्व दिले जाते. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि सामान्य नागरिकांना त्याचा फटका बसतो.

लोकशाही व्यवस्थेत सत्तांतर ही एक नैसर्गिक आणि आवश्यक प्रक्रिया आहे. सत्तेत बदल झाल्याने नवीन विचार, नवीन धोरणे आणि नवीन नेतृत्वाला संधी मिळते. परंतु जर सत्तेला चिकटून राहण्याची मानसिकता वाढत गेली, तर ही प्रक्रिया कमकुवत होते. विरोधी पक्षांची भूमिका देखील मर्यादित होते आणि लोकशाहीचा समतोल बिघडतो.

यावर उपाय म्हणून राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनी आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सत्ता ही अंतिम ध्येय नसून, जनतेची सेवा करण्याचे माध्यम आहे, ही जाणीव पुन्हा प्रस्थापित करणे गरजेचे आहे. यासाठी राजकीय संस्कृतीत बदल होणे आवश्यक आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नैतिकता या मूल्यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे.

तसेच जनतेची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मतदारांनी केवळ भावनिक किंवा जातीय समीकरणांवर आधारित निर्णय न घेता, कामगिरी आणि धोरणांच्या आधारे नेत्यांची निवड केली पाहिजे. जे नेते केवळ सत्तेसाठी राजकारण करतात, त्यांना योग्य धडा शिकवणे ही लोकशाहीची ताकद आहे.

शेवटी, "सत्ता कोणालाही सोडायची नाही" ही मानसिकता बदलणे सोपे नाही; परंतु ती बदलली नाही तर लोकशाहीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. सत्ता टिकवण्यापेक्षा जनतेचा विश्वास टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे, हे राजकारण्यांनी ओळखले पाहिजे. अन्यथा सत्तेची ही शर्यत कधीच संपणार नाही आणि त्यात जनतेचे हित कायमच मागे पडत राहील.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## कुशाग्र बुद्धिमत्ताः आपली अमूल्य संपत्तीच

### (26 एप्रिल:जागतिक बौद्धिक संपदा दिन.)

_आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. त्या संपत्तीचेही संरक्षण, संवर्धन आणि उपयोजन निटपणे केले पाहिजे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर संकलित मार्गदर्शक लेख... संपादक._

जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी 26 एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन 2000 साली या दिवसाची स्थापना करण्यात आली. जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो, ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाङ्मयचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाङ्मयचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय. प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रुप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आली असावी. ग्रीक, लॅटीननंतर नंतर 1601 साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन 1620च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन 1755 साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या " अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉईटिंग्ज ऑफ अनादर", "दी क्राईम ऑफ लिटररी थीफ्ट" अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटीन प्लेजिअरिअस हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

बौद्धिक संपदा म्हणजे काय? तर बौद्धिक संपदा- आईपी मनाच्या निर्मितीचा संदर्भ देते, जसे की आविष्कार; साहित्यिक आणि कलात्मक कामे, रचना आणि वाणिज्यमध्ये वापरलेली चिन्हे, नावे आणि प्रतिमा आईपी कायद्यामध्ये संरक्षित आहेत. उदाहरणार्थ, पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क, जे लोकांना त्यांनी जे काही शोध लावले किंवा तयार केले त्यापासून मान्यता किंवा आर्थिक लाभ मिळवण्यास सक्षम करते. नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित यांच्यातील योग्य संतुलन साधून, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता वाढू शकेल अशा वातावरणाला प्रोत्साहन देण्याचे आईपी शासनाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बौद्धिक संपदा संघटना ही जागतिक बौद्धिक संपदा दिन स्थापन करण्यासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. संस्था बौद्धिक संपदा धोरण, सेवा आणि सहकार्यासाठी जागतिक मंच म्हणून काम करते. डब्ल्यूआईपीओ ही 193 सदस्य राष्ट्रांसह स्व-वित्तपुरवठा करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. नॅशनल अल्जेरियन इंडस्ट्रियल प्रॉपर्टी इन्स्टिट्यूट-आईएनएपीआईच्या महासंचालकांनी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची स्थापना सुरु केली. हा दिवस कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि पेटंटबद्दल जागरुकता निर्माण करतो. हे कायदे आणि नोंदणी आहेत जे निर्माते आणि नवोदितांच्या मूळ कार्याचे संरक्षण करतात. यामध्ये लेखक, कलाकार, शोधक आणि ब्रँड यांचा समावेश असू शकतो जे निर्मात्यांना त्यांच्या कामाचे अधिकार आहेत, याची खात्री करण्यात मदत करतात. बौद्धिक संपदा नियम अधिक विकासास प्रोत्साहन देतात. मूळ कामाची पायरसी रोखण्यासाठी, निर्मात्यांना त्यांच्या आविष्कारांची पूर्ण मालकी असावी या कल्पनेला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा नियम असणे महत्त्वाचे आहे. बौद्धिक मालमत्तेची चोरी युनायटेड स्टेट्समध्ये दरवर्षी सुमारे $225 अब्ज ते $600 अब्ज खर्च करते. हे नियम निर्माते आणि देशाचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यात मदत करतात.

!! जागतिक बौद्धिक मालमत्ता दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- 9699836717..**

## सत्तापिपासूत्वाचा पाश त्यात अहंकाराचा विळखा !

**© दत्तात्रय काळे - 9607072505**




2012 साली भ्रष्टाचारमुक्त भारत घडवण्याच्या उद्देशाने "आम आदमी पार्टी" या पक्षाची स्थापना झाली. सामान्य माणसाला न्याय, पारदर्शकता आणि सुलभ प्रशासन देण्याचे आश्वासन देत हा पक्ष उभा राहिला. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनातून उभ्या राहिलेल्या या पक्षाने अल्पावधीतच जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळवला. मात्र आज, 2026 मध्ये या पक्षाकडे पाहिल्यास वेगळे चित्र दिसते. सुरुवातीला ज्या तत्त्वांवर पक्ष उभा राहिला, त्याच तत्त्वांपासून दूर जात असल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. पक्षातील स्वच्छ प्रतिमेचे अनेक नेते एकामागून एक बाहेर पडले, ही बाब केवळ योगायोग मानता येणार नाही. केजरीवालांचा सत्तापिपासूपणा आणि त्यात त्याच मोहापायी आलेला अहंकार यातूनच हे पक्षांतर्गत महाभारत घडत असल्याचे अनेक राजकीय विश्लेषकांचे स्पष्ट मत पुढे येत आहे.

योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, कुमार विश्वास, मयंक गांधी, अंजली दमानिया यांसारख्या संस्थापक नेत्यांनी पक्ष सोडताना नेतृत्वशैलीवरच प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर कपिल मिश्रा, अलका लांबा, एच. एस. फुलका यांसारख्या अनेकांनी वेगवेगळ्या कारणांनी पक्षाशी फारकत घेतली. अलीकडील घडामोडींमध्ये काही खासदारांनीही पक्ष सोडल्याने या असंतोषाची तीव्रता अधिक स्पष्ट झाली आहे. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी अरविंद केजरीवाल यांच्या बदलत्या धोरणांची चर्चा होताना दिसते. एकेकाळी सामूहिक नेतृत्व आणि लोकशाही मूल्यांवर भर देणारा पक्ष हळूहळू केंद्रीकृत होत चालल्याची टीका वाढत आहे. त्यामुळे आंदोलनातून जन्मलेल्या या पक्षाची वाटचाल आता सत्ताकेंद्रित होत आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्रातही याचे परिणाम स्पष्टपणे दिसून येतात. सुरुवातीला पक्षाला बळ देणारे अनेक महत्त्वाचे चेहरे आज त्यापासून दूर गेले आहेत. विशेषतः मयंक गांधी आणि अंजली दमानिया यांसारख्या स्वच्छ प्रतिमेच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी पक्ष सोडल्याने, राज्यातील पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाले. परंतु या नेत्यांनी केवळ पक्ष सोडला, तत्त्वे नाहीत. मयंक गांधी हे शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून अहोरात्र कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विकास, जलसंधारण आणि शाश्वत शेती या क्षेत्रात त्यांचे योगदान लक्षणीय आहे. दुसरीकडे अंजली दमानिया या राज्यातील भ्रष्टाचाराविरोधात सातत्याने आवाज उठवत असून, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देत आहेत. आज या दोघांसह पक्षातून बाहेर पडलेले अनेक नेते वेगवेगळ्या मार्गांनी कार्य करत असले, तरी त्यांचा मूलभूत उद्देश एकच आहे तो म्हणजे समाजाचे कल्याण. राजकारणाच्या चौकटीबाहेर राहून ते शेतकरी, महिला, पीडित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर काम करत आहेत.

कोणत्याही औपचारिक संघटनेशिवाय, समान विचारांच्या धाग्याने जोडलेले हे कार्यकर्ते समाजपरिवर्तनासाठी वेगवेगळ्या मार्गाने लढत आहेत. भ्रष्टाचाराविरोधात लढा, महिलांवरील अत्याचारांविरुद्ध आवाज, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि न्यायासाठीची सर्व मुद्द्यांवर त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरु आहेत. आज देशात परिवर्तनाची गरज पुन्हा प्रकर्षाने जाणवत आहे. अशा वेळी, सत्तेच्या राजकारणापलीकडे जाऊन काम करणाऱ्या या विचारवंतांची आणि कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. निष्कर्षतः, आम आदमी पक्षाचा प्रवास हा एका आदर्शातून सुरु होऊन वास्तवाच्या वळणावर येऊन ठेपलेला दिसतो. अरविंद केजरीवाल यांच्या बदलत्या धोरणांमुळे अनेकांनी पक्ष सोडला असला, तरी त्यांनी मूळ उद्दिष्टे सोडलेली नाहीत. मयंक गांधी आणि अंजली दमानिया यांसारखी मंडळी आजही महाराष्ट्रात त्याच प्रामाणिकतेने समाजासाठी कार्यरत आहेत. भविष्यात गरज पडल्यानंतर समाजहित आणि राष्ट्रहिताच्या मुद्द्यावर हे विचार एकत्र येऊ शकतात.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

दुपारी अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्ते आणि बाजारपेठेत शुकशुकाट दिसत आहे. दरम्यान, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारी 12 ते 4 या वेळेत बाहेर पडू नये. बाहेर पडताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा गॉगल वापरणे, तसेच पाण्याची बाटली सोबत ठेवणे आवश्यक असल्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. अकोल्यासह इतर काही जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

-------------------------------------------

नॉर्थ बॉम्बे असोसिएशन (पंजाब असोसिएशन) येथे त्यांच्या चौथ्याची विधी पार पडणार आहे. भरत यांच्या अंत्यसंस्काराला राकेश बेदी, दिग्दर्शक रमेश कुमार, अभिनेते कुलदीप सिंग, तसेच IPTA थिएटर ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.भरत कपूर कोण आहेत?भरत कपूर यांच्या प्रसिद्ध चित्रपटांमध्ये नूरी (1979), राम बलराम (1980), लव्ह स्टोरी (1981), बाजार (1982), गुलाम (1985), आखरी रास्ता (1986), सत्यमेव जयते (1987), स्वर्ग (1990), खुदा गवाह (199), बरसाह (1981), 1990 (1990), (1995), साजन चले ससुराल (1996), आणि मीनाक्षी: ए टेल ऑफ थ्री सिटीज (2004) यांचा समावेश आहे. तसेच त्यांनी कॅम्पस, परंपरा, राहत, सांस, अमानत, भाग्यविधाता, तारा, चुनौती आणि कहानी चंद्रकांता की सारख्या टाव्ही सीरियल्स आणि शोमध्ये देखील काम केले.

----------------------------------------

रजा, खाण कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना कामाच्या जागीच कायमचे सुविधा आदी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय बाबासाहेबांनी घेतले. मजूर मंत्री असतानाच त्यांच्याकडे जल मंत्री पदाचाही कार्यभार होता.पाण्यासाठी सत्याग्रह कराव्या लागणाऱ्या बाबासाहेबांनी भारताच्या पाण्याचे नियोजन केले.

फुले, शाहू, आंबेडकर ही परंपरा आहे आणि ती परंपरा बुध्दापासून सुरु होते.आपले नेते फुले शाहू आंबेडकरांचे दिवसभर नाव घेतात पण काम मात्र विरोधात करतात.महात्मा फुले यांनी दु:खाचे मुळ मांडले. छत्रपती शाहु महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी शपथ घेतली.असा प्रजेसाठी शपथ घेणारा जगातील पहिला राजा होता असे ते म्हणाले. आपल्या चौफेर व्याख्यानात उत्तम कांबळे यांनी बाबासाहेब यांच्या जीवनावर संपूर्ण प्रकाश टाकला.भारत देश माणसाच्या कर्तृत्व आणि ज्ञानावर चालत नव्हता. पण बाबासाहेबांचा जन्म म्हणजे अंधार युगाचा अंत आणि उजेडाची सुरवात होती.देव आपल्यात क्रांती घडवणार नाही तर शिक्षण आणि राजकारण अतिशय महत्त्वाचे आहे असे बाबासाहेबांना वाटायचे.1937 च्या निवडणुकीत बाबासाहेबांच्या पक्षाला प्रचंड यश मिळाले. पण जगातील सर्वात विद्वान असणाऱ्या बाबासाहेबांना या देशातील जनतेने मात्र 1952 आणि 54 च्या निवडणुकीत पराभव केले. हा पराभव म्हणजे भारताला नवी दिशा देणाऱ्या, नवा विचार देणाऱ्या ,देशात सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या महान अशा विचारवंताचा पराभव होता असेही उत्तम कांबळे यांनी सांगितले.

अध्यक्ष समारोप करताना प्रा. प्रदीप रोडे यांनी अशा प्रकारे सामाजिक उपक्रम घेऊन बाबासाहेबांना अपेक्षित जयंती होणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विलास रोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सिद्धार्थ जगतकर यांनी केले. याच कार्यक्रमात उत्तम कांबळे यांच्या हस्ते 18 तास अभ्यास उपक्रमात सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला, पुरुष, आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

--------------------------------

माणूस पुन्हा कधीच परतत नाही, इतकी भीषण अवस्था या महामार्गाची झाली आहे.खामगाव-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गामुळे माजलगावचे नाव देशाच्या नकाशावर आले खरे, पण निकृष्ट दर्जाच्या कामामुळे आज हा रस्ता शाप ठरत आहे. काम पूर्ण होण्याआधीच रस्त्याला पडलेल्या मोठ्या भेगांमुळे अपघातांची मालिका सुरु झाली. आतापर्यंत या मार्गाने 35 जणांचा घास घेतला आहे. मात्र, प्रशासनातील ढिम्म अधिकाऱ्यांना अद्यापही याच्या दुरुस्तीचा मुहूर्त सापडलेला नाही. पावसाळा तोंडावर असताना या भेगा अधिकच धोकादायक ठरणार असून, प्रशासकीय उदासीनतेचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे.

“राष्ट्रीय महामार्ग असतानाही संबंधित गुत्तेदार, कंपनीने रस्ता काम दर्जाहिन केले. परिणामी काम पूर्ण होईपर्यंतच रस्त्याला भेगा पडल्या, त्यामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून शासनाने तत्काळ या रस्ता दुरुस्तीकडे लक्ष द्यावे, अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.”

या रस्त्यासाठी अनेक सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांनी आंदोलने केली, रस्ता रोको झाला, पण प्रशासनाने केवळ माती टाकून तात्पुरती मलमपट्टी करण्यापलीकडे काहीही केले नाही. विशेष म्हणजे, निवडणूक काळात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या रस्त्याबाबत आश्वासन दिले होते. मात्र, आजघडीला परिस्थिती जैसे थे आहे. पावसाळ्यात या भेगांमध्ये पाणी साचल्यावर दुचाकी आणि रिक्षांची चाके अडकून मोठ्या जीवितहानीची शक्यता निर्माण झाली आहे.

----------------------------------

यांच्या संविधानामुळे दिन, दलित, दुबळे यांच्या जीवनात अमूल्य सकारात्मक बदल झाले.आज बहुजन समाज जो सतेत दिसत आहे तो फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच आहे.

या कार्यक्रमास बेलंबा सरपंच महानंदाताई सरवदे, बेलंबा सेवा सो.चेअरमन संजय गित्ते, बेलंबा उपसरपंच किशोर गित्ते,दशरथ (भाऊ) गित्ते,सीताराम गित्ते (गुरुजी),शालेय समिती अध्यक्ष केशव गित्ते,बाबा सरवदे,संभाजी सावंत,राम सरवदे, अशोक तायडे, राजेभाऊ कांबळे,सुनील कांबळे, आदी सर्व भीम अनुयायी आणि गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

भीम जयंती उत्सव समिती बेलंबा अध्यक्ष राष्ट्रपाल सावंत उपाध्यक्ष मंगेश तायडे आणि सर्व पदाधिकारी यांनी सुंदर नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला.

-------------------------------------

यांनी दिली आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदेने शहरातील प्रभाग 1 ते 17 मध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी विस्तारित नवीन पाईप लाईन टाकण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी तांत्रिक मान्यता दिल्यानंतर आता जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम प्रशासकीय मंजुरी दिली आहे.शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मंजूर रक्कम ही पाणीपुरवठा व्यवस्थापन, पाण्याचे शुद्धीकरण आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी वापरली जाणार आहे. सध्याच्या मंजुरीनुसार, शहरातील प्रभाग क्रमांक एक ते 17 या प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाणीपुरवठ्याची पाईप लाईन विस्तारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.या निर्णयामुळे परळी शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असून ज्या भागात पाईप लाईन नव्हती त्या ठिकाणी विस्तारित पाईप लाईन टाकली जाणार आहे. मंजूर निधीमधून विविध प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाईन ची मंजूर असलेली एकूण सहा किलोमीटरची कामे केली जाणार आहेत. या अनुषंगाने पाणी पुरवठयाबाबत नागरिकांना दिलासा मिळणार आहे असा विश्वास नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, पाणी पुरवठा सभापती सौ जयश्रीताई गीते, मुख्याधिकारी पी एन निगळ यांनी व्यक्त केला आहे.

-------------------------------------

शेतकरी बांधव आनंद व्यक्त करत आहेत .तरी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपली रक्कम महेश को-ऑपरेटिव्ह बँकेतून घेऊन जावी असे कारखान्याच्या वतीने कळविण्यात आले आहे.

-----------------------------------

आठ महिने पावसाचे पाणी वहात असते. याच नदीवर सार्वजनिक स्मशानभूमी जवळ नाथ पॅटर्न चा बंधारा बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन नदी संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर विविध उपाय योजना करीत असते. मात्र परळी नगरपरिषद आपल्या शहरातील नदी पात्राचे सिमेंटीकरण करत आहे. महाराष्ट्र आपत्ती सौमीकरण प्रकल्प अंतर्गत परळीतील सरस्वती नदीपात्रात काँक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेण्यात आला मात्र यामुळे पर्यावरणाला व भूजल पातळीला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा अश्विन मोगरकर यांनी दिला आहे.

सरस्वती नदीमुळे जवळपास अर्ध्या परळी शहरात भूजल पातळी वाढण्यास मदत होते. या नदीतून वाहणारे पाणी जमिनीत मुरुन गावभागातील आड (घरातील छोट्या पाण्याच्या विहिरी) बोअरवेल ला पाणी टिकून असते व जमिनीत पाण्याचे पुनर्भरण होते व भूजल पातळी वाढते.

मात्र नुकत्याच मंजूर झालेल्या सरस्वती नदीपात्राचे संपूर्ण सिमेंट काँक्रीटीकरण यामुळे गावभागातील परिस्थिती भविष्यात गंभीर होणार आहे. गावभागातील संपूर्ण नैसर्गिक परिसंस्था (ecosystem) बदलून जाणार आहे. भविष्यात पाण्यावरची परळी ही बिनपण्याची परळी होऊन जाईल. याविषयात गावभागातील रहिवाश्यांना कुठलीही माहिती न देता हा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याचा आरोप अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित पर्यावरण व भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट काँक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी करत परळी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांना 27 एप्रिल, सोमवारी दिलेल्या निवेदनात भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

---------------------------------------

पहिल्या टप्प्यात 27 गाळे भाडेतत्त्वावर दिले जाणार आहेत. यासाठी किमान अनामत रक्कम 50,000 रुपये निश्चित करण्यात आली असून, निविदा शुल्क 5,000 रुपये आहे.24 एप्रिल 2026 (दुपारी 6 वाजल्यापासून) निविदा उपलब्ध आहेत. अर्ज करण्याची शेवटची तारीख: 11 मे 2026 (सकाळी 11 वाजेपर्यंत) आहे. 14 मे 2026 (सकाळी 11 ते दुपारी 4 वाजेपर्यंत) ई-लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे. या लिलावात सहभागी होण्यासाठी www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी असणे अनिवार्य आहे. तसेच, अर्जदारांकडे डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) असणे आवश्यक आहे. गाळ्यांचे मासिक भाडे 10,433 रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले सर्व आवश्यक कागदपत्रे, बँक तपशील आणि नगर परिषदेचा ना-हरकत दाखला विहित मुदतीत ऑनलाइन अपलोड करावा, असे आवाहन परळी वैजनाथ नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

हे गाळे सुरुवातीला 3 वर्षांच्या मुदतीसाठी भाड्याने दिले जातील. त्यानंतर भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करून तो जास्तीत जास्त 9 वर्षांपर्यंत वाढवता येईल. प्रत्येक गाळ्यासाठी 20 लाख रुपये अधिमूल्य (नॉन-रिफंडेबल) निश्चित करण्यात आले असून, लिलावात यापेक्षा जास्त बोली लावणारा पात्र ठरेल. गाळेधारकास प्रतिमहा 10,433 रुपये भाडे भरावे लागेल. दर तीन वर्षांनंतर नियमानुसार भाड्यात वाढ केली जाईल. नगर परिषदेचा कोणताही कर थकीत असलेल्या व्यक्तीला या प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. ‘बेबाकी प्रमाणपत्र’ जोडणे अनिवार्य आहे. लिलावात यशस्वी झालेल्या धारकाला एकूण रकमेच्या 50% रक्कम 10 दिवसांच्या आत आणि उर्वरित 50% रक्कम 30 दिवसांच्या आत भरावी लागेल. पूर्ण रक्कम भरल्याशिवाय गाळ्याचा ताबा दिला जाणार नाही. या व्यापारी संकुलामुळे शहरातील व्यापार विस्ताराला मोठी मदत होणार असून, इच्छुकांनी अटी व शर्तींचे पालन करून लिलावात सहभागी व्हावे, असे आवाहन नगर परिषदेने केले आहे.

----------------------------------

उपक्रमाची घोषणा केली असून, प्रवाशांचा विश्वास पुन्हा संपादन करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे एसटीच्या ताफ्यात बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासी संख्या आणि महसुलात अपेक्षित वाढ झालेली नाही. ही बाब लक्षात घेऊन महामंडळाने आता केवळ सेवा न देता, तिला ‘मानवी स्पर्श’ देण्याचे ठरवले आहे. या अभियानांतर्गत एसटीचे चालक आणि वाहक केवळ कर्मचारी न राहता ‘सेवक’ म्हणून प्रवाशांच्या मदतीला धावतील. प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी चालक स्वतःची ओळख करून देतील आणि प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, प्रमुख थांबे आणि पोहोचण्याची वेळ याबद्दल माहिती देतील. आपली बस, आपली सेवा’ हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रवाशांनीही ‘सहप्रवासी’ म्हणून साथ द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बसमध्ये स्वच्छता राखणे, ऑनलाइन आरक्षणाचा आणि ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्डचा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच आपल्या सामानाची जबाबदारी घेणे, यांसारख्या सवयींमुळे प्रवास अधिक सुखकर होईल, असे महामंडळाने म्हटले आहे. अनेकदा तांत्रिक बिघाड किंवा अन्य कारणांमुळे बस रद्द होते. अशावेळी प्रवाशांचे हाल होऊ नयेत म्हणून तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, प्रवाशांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक स्वतंत्र आणि तत्पर यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. बसस्थानक परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

-------------------------------------

स्वयंपाकघरात हवेशीर वातावरण ठेवावे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अधिक माहितीसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सोशल मीडिया हँडलला (@SDMAMaharashtra) भेट द्यावी किंवा जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांचे पालन करावे. स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उष्माघातापासून बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## पान 4 वरुन

प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेचे लक्ष दुसऱ्याच मुद्द्यांकडे वळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. डॉक्टर भालचंद्र वाचनालय कितीक वर्षानंतर सुरु झाला तसाच अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृह चालू करण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

---------------------------------

मुले आणि मोठा परिवार आहे. त्यांच्यावर आज सायंकाळी 5:30 वाजता निमगाव सावा येथील कुकडी नदी तीरावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने आणि आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वाढत्या तापमानामुळे विशेषतः शेतकरी आणि कष्टकऱ्यांनी दुपारी 12 ते 4 या वेळेत कष्टाची कामे टाळावीत. कामाच्या ठिकाणी सोबत पाणी, लिंबू सरबत किंवा ताक ठेवावे आणि डोक्याला रुमाल किंवा टोपीचा वापर करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

--------------------------------------

ते संपूर्ण जगासाठी ज्ञानाचे प्रतीक आहेत. त्यांनी आपल्याला ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा मंत्र दिला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. आजच्या धावपळीच्या युगात शिक्षण हेच एकमेव शस्त्र आहे, ज्याच्या जोरावर आपण प्रगती करु शकतो. बाबासाहेबांचे विचार नुसते भिंतीवर लावू नका, तर ते आपल्या हृदयात आणि कृतीत आणा. एकमेकांना मदत करा, सामाजिक सलोखा राखा असे आवाहन डॉ. भरत मुंडे यांनी केले या कार्यक्रमास टोकवाडी चे पंचायत समिती माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, टोकवाडीच्या सरपंच गोदावरी ताई राजाराम मुंडे डॉ. राजाराम मुंडे माजी सरपंच मारोतराव मुंडे गुरुजी, नाथराव दादा मुंडे, संभाजी मुंडे (योग प्रशिक्षक),विवेकानंद हॉस्पिटलचे संचालक डॉ. भरत मुंडे , नवनाथ मुंडे,भाजपा तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे , युवा नेते तुकाराम टी.डी.मुंडे, उद्योजक संतोष मुंडे , टोकवाडी ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच बंडूभाऊ काळे डॉ. संदीपान काळे, सोपान तात्या मुंडे, श्रीराम मुंडे, ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य तुकाराम भक्तराम मुंडे, युवा उद्योजक अर्जुन मुंडे,ज्येष्ठ नेते महादेव आण्णा मुंडे , श्रीनिवास मुंडे,प्रदीप घुले, माउली फड, राजाभाऊ गित्ते,गणेश नागरगोजे,दिलीप भालेराव, भरत रोडे , पंडितराव रोडे,अमर रोडे , साहेबराव रोडे, माजी उपसरपंच सुरेश रोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

-----------------------------------------------

बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड तर रिपाईचे राज्यसचिव भास्कर नाना रोडे, मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. दासू वाघमारे, सरपंच अमोल कराड ,सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम गवळी, राम भिसे, पोलीस पाटील हरिभाऊ कराड ,गुरु कराड, महाराष्ट्र न्यूज 1 चे संपादक श्रीमंत खांडेकर , अण्णा गवळी, अंकुश गवळी आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भास्कर नाना रोडे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना रानबा गायकवाड म्हणाले की, बाबासाहेबांची जयंती म्हणजे यात्रा नाही तर विचारांची जयंती आहे. प्रबोधनाची जयंती आहे.तो विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी,हजारो वर्षांच्या गुलामीच्या बेड्या तोडून माणूस म्हणून आपणाला हक्क आणि अधिकार देणा-या महामानवाला अभिवादन करण्यासाठी जयंतीला आले पाहिजे. ज्या शिक्षणाच्या बळावर आपली प्रगती झाली त्या शिक्षणावरच घाव घालण्याचे काम चालू आहे.अनेक सरकारी शाळा बंद केल्या जात आहेत.यावेळी रिपाईचे राज्यसचिव भास्कर नाना रोडे, मराठवाडा उपाध्यक्ष प्रा.दासू वाघमारे, सरपंच अमोल कराड,मुक्ताराम गवळी यांनी आपले विचार मांडले.तसेच लहान विद्यार्थी व विद्यार्थिनी पृथ्वीराज विजय गवळी,चि.वंश शिवशंकर गवळी,कु.आरोही दयानंद गवळी यांनी उत्कृष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर भाषणं केल कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्ताराम गवळी यांनी केले तर उत्कृष्ट सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन आनंद तुपसमुद्रे यांनी केले. कार्यक्रमास रामेश्वर शिंदे, निवृत्ती गवळी, दिनकरराव शिंदे, परमेश्वर शिंदे, यशवंत सोनवणे, बबन (दादा) नाटकर, सचिन मुंडे, क्षणिक शिंदे, निलेश क्षिरसागर, अमोल क्षिरसागर, अतुल गवळी, सुरज सोनवणे यांच्या सह महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल गवळी, उपाध्यक्ष शिवशंकर गवळी, सचिव नितीन आरगडे, सहसचिव विजय गवळी, कोषाध्यक्ष दयानंद गवळी व इतर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

--------------------------------------

दिल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, सुनावणीदरम्यान सादर झालेल्या कागदपत्रांची तपासणी, शासकीय नोंदी आणि संबंधित पुराव्यांचा सखोल अभ्यास केल्यानंतर आरोपांना ठोस आधार नसल्याचे स्पष्ट झाले. सरपंच कुरेशी रुखयाबी यांच्या वतीने ड. सय्यद शाकेर इसाक यांनी प्रभावी आणि कायदेशीर दृष्ट्या भक्कम युक्तिवाद सादर केला.त्यांनी अर्जदारांकडून मांडण्यात आलेल्या प्रत्येक मुद्द्याला कायदेशीर उत्तर देत, नामनिर्देशन प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नियमांनुसार झाल्याचे दाखवून दिले. तसेच, कोणतीही माहिती लपविणे किंवा चुकीची माहिती देणे सिद्ध होत नसल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. जिल्हाधिकारी यांनी आपल्या आदेशात नमूद केले की, अर्जदाराने गैरअर्जदार यांच्या अपत्याबाबत केलेला आरोप हा ठोस, निर्विवाद व कायदेशीर दृष्ट्या ग्राह्य पुराव्याने सिद्ध केलेले नाही .अर्जदाराने सादर केलेले कागदपत्रे हे अपूर्ण व विवादित असून त्यावरुन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1969 च्या कलम 14 (ज-1) अंतर्गत सरपंच कुरेशी रुखयाबी यांना सरपंच पदासाठी अपात्र ठरविण्यास पुरेसा व विश्वासहार्य आधार उपलब्ध नाही. अपात्रतेसाठी आवश्यक असलेले ठोस पुरावे सादर करण्यात अर्जदार अपयशी ठरले आहेत.परिणामी, अपात्रतेचा दावा ग्राह्य धरता येत नसल्याने अपील नामंजूर करण्यात येत आहे. या निकालामुळे सरपंच कुरेशी रुखयाबी यांना मोठा दिलासा मिळाला असून, ड. सय्यद शाकेर यांच्या युक्तिवादाची कायदेवर्तुळात प्रशंसा होत आहे. सदर प्रकरणात ॲड. सय्यद शाकेर यांना ॲड. सय्यद साजेद अली यांनी मार्गदर्शन केले.

---------------------------------------------

शेअरिंग आणि कॅरिंग (Sharing & Caring) यांसारख्या मूल्याधारित उपक्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास:चांगल्या सवयी (Good Habits) व वाईट सवयी (Bad Habits) याबाबत मार्गदर्शनजेवताना म्हणायचे श्लोक, टेबल मॅनर्स व शिस्तीचे धडेमोबाईलच्या वाढत्या वापराबाबत जनजागृतीगोष्टी, नाटिका व अभिनयाद्वारे मूल्य शिक्षण‘स्ट्रेंजर डेंजर’ विषयावर नाट्यरूप सादरीकरणवरील सर्व विषय मुलांना नाटिकांद्वारे समजावून सांगण्यात आलेविशेष आकर्षण:मुलांसाठी एक दिवस सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत रेन डान्स, मड ॲक्टिव्हिटी व पूल पार्टीचा समावेश होता. मुलांनी वॉटर पार्कसारखा आनंद अनुभवला.

कॅम्पदरम्यान दररोज मुलांना विविध प्रकारचे एनर्जी ड्रिंक्स देण्यात आले. तसेच एक दिवस “फ्रूट पार्टी”चेही आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये मुलांनी आनंदाने सहभाग घेतला.“मूवी डे” अंतर्गत प्रेरणादायी व मनोरंजक चित्रपट दाखवण्यात आला. तसेच थिएटरमधील अनुभव (तिकीट खरेदी, पॉपकॉर्न घेणे इ.) प्रत्यक्ष कृतीतून शिकवण्यात आले. समारोप विशेष: कॅम्पच्या शेवटच्या दिवशी पालकांना आमंत्रित करून त्यांच्या सहभागातून “फ्लेमलेस कुकिंग” उपक्रम आयोजित करण्यात आला. विविध खाद्य प्रकारांचे सुमारे 45 स्टॉल लावण्यात आले होते. या उपक्रमामागील उद्देश मुलांना स्वतःसाठी साधे खाण्याचे पदार्थ तयार करता यावेत व त्याबाबत थोडेसे ज्ञान मिळावे हा होता. पालकांनीही या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला.परिश्रम व उद्देश: या संपूर्ण समर कॅम्पसाठी युनिक क्युरियस किड्सच्या सर्व शिक्षिकांनी तसेच संचालिका पूजा सारडा मॅडम यांनी अत्यंत परिश्रम घेतले. कॅम्पचा मुख्य उद्देश मुलांचे फाइन मोटर स्किल्स, बौद्धिक क्षमता, सामाजिक वर्तन आणि नवीन गोष्टी शिकण्याची आवड विकसित करणे हा होता. यासोबतच मुलांचे कोऑर्डिनेशन, एकाग्रता, योगासनामुळे शरीराला मिळणारी बळकटता तसेच त्यांची स्किल डेव्हलपमेंट वाढवणे हे देखील या उपक्रमामागील महत्त्वाचे उद्दिष्ट होते.पालकांनी दिलेल्या सहकार्यामुळे हा समर कॅम्प अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

----------------------------------

नोंदविण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जाते, असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला. अनेक प्रकरणांमध्ये आरोपींना महिनोन्महिने अटक न होणे, तसेच पोलिसांच्या कारवाईतील दिरंगाई यावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या सर्व पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणेने अधिक कठोर आणि तत्काळ भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.या मागण्यांसाठी मंगळवार, दि. 28 एप्रिल 2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा असा जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असून, त्यानंतर पोलीस उपविभागीय अधिकार्‌यांना निवेदन देण्यात येणार आहे. मोर्चामध्ये हजारो नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष सचिन साळवे, जिल्हा नेते हिराचंद काळे, अशोक सरवदे, धारूर तालुका अध्यक्ष राकेश शिरसट, दया वागमारे, दीपक ओव्हाळ, तुषार भालेराव, सूरज शिंदे आणि दिक्षा गायकवाड यांनी केले आहे.

--------------------------------------

भिन्न धर्मीय तरुण हा अंबाजोगाई तालुक्यातील त्याच्या आजोळी गेलेला असल्याचे समजले.मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरुन त्यांच्या गावातील भिन्न धर्मीय इसम हा त्याच्या 16 वर्षाच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून गेल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी केज पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यावरुन भिन्न धर्मीय इसमा विरुद्ध गु. र. नं. 243/2026 भा. न्या. सं. 137(2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे करीत आहेत.

-----------------------------------

पोलिस ठाण्यात पोहचला मात्र दोन्ही गट या ठिकाणी जमा झाल्याने ठाण्यासमोरच एकमेकांवर दगडफेक झाली. यानंतर सौम्य लाठीमार करत जमाव पांगवण्यात आला. तसेच बीड येथून पोलिसांची कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली. नेकनूरमध्ये अलीकडे रस्त्यावर काही किरकोळ अपघात घडल्यास मोठ्या वादात रुपांतर होण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. असाच प्रकार शनिवारी रात्री आठच्या दरम्यान बसस्थानकासमोर घडला. रिक्षाकडून दुचाकीला कट बसल्याचे कारणाने मोठे स्वरुप घेतले. या रिक्षात असलेल्या महिलांना मारहाण करण्यात येत असल्याचे दिसताच आजूबाजूच्या काहींनी यामध्ये हस्तक्षेप केला. मात्र यानंतर हा वाद वाढत पोलिस स्टेशनकडे गेला. बघता बघता दोन्ही समाजातील लोकांनी पोलिस ठाण्यासमोर गर्दी केली आणि वादाने मोठे स्वरुप प्राप्त करीत ठाण्यासमोर एकमेकांवर दगडफेक सुरु केली. पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी केज, बीड येथून पोलिसांची कुमक मागवत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. वै. व्यंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी सकाळची अखंड हरीनाम सप्ताह ठप्पा राहिला असून या कीर्तनासाठी जाणाऱ्या रिक्षा चालकासह महिलेला मारहाण झाल्याच्या वृत्ताने नेकनूरमध्ये संतापाची लाट उसळली. यामुळे नेकनूर अशांत झाल्याचे पाहायला मिळाले. केजचे पोलिस उपअधीक्षक व्यंकटराम हे रात्री नेकनूरमध्ये परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पोलिसांच्या फिर्यादीवरुन दोन्ही गटातील लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेकनूरचा रविवारचा आठवडी बाजार यामुळे बंद राहिला. नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये महिलेच्या फिर्यादीवरुन तसेच पोलीस स्टेशन समोर दगडफेक झाल्याने पोलिसांच्या फिर्यादीवरुन वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे नोंदवण्यात आले. यातील 10 जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी नेकनूर येथे भेट दिली. पुढील तपास उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे करीत आहेत.

----------------------------------

पिक विमा तात्काळ मंजूर करण्यात यावा. नवीन पीक विमा योजना बंद करून जुनीच पीक विमा योजना लागू करा.शेतकऱ्यांना व शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांना संरक्षण देण्यासाठी 100% अनुदान तत्त्वावर शेताला कुंपण द्या,शेतकऱ्यांचे कर्ज सरसकट माफ करा. विविध कारखान्यांकडे थकीत असलेली ऊस बिले तात्काळ खात्यात जमा करा. इरला व येळा तांडा या दोन्ही गावातील शेतकऱ्यांमध्ये पाईपलाईन वरून चाललेला वाद महसूल प्रशासनाने मध्यस्थी करून तात्काळ मिटवावा. जायकवाडी उजव्या कालव्याचे पाणी विलंबनाने येत आहे त्या पाण्याचे आवर्तन वेळेवर करावे. छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्या बागेश्वर शास्त्री व आमदार संजय गायकवाड यांच्यावर दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात यावे. या मागण्या निवेदनात केलेल्या आहेत या आंदोलनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव शिवाजी कुरे किसान सभा तालुका सचिव कृष्णा सोळंके तालुकाध्यक्ष अशोक डाके मुसद्दीक बाबा, गणेश कदम, बंडू राम गरड, अरुण गरड, रामचंद्र चिंचणे विकास थेटे, रावसाहेब बेदरे, बाबासाहेब गरड, जनक तेलगड, शिवाजी राऊत,यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला

-------------------------------------

परळी वैद्यनाथ शहरापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीपासून जवळच लाखों भाविकांचे श्रद्धास्थान श्री संत जगमित्र नागा मंदिर येथे परळी वैजनाथची जगमित्र नागा | ध्यानी पांडुरंग आठवितो || श्री संत महान तपस्वी जीवनेश्वर काळुबाबा व आद्यग्रामदैवत श्री कालभैरवनाथ कृपेने व वैकुंठवासी प.पू गुरुवर्य ह भ प बबन महाराज यांच्या प्रेरणेने व ह. भ. प. वसंत महाराज थोरमले (उत्तराधिकारी) यांच्या मार्गदर्शनाने 22 वे फिरता अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री संत तुकाराम महाराज गाथा पाचवा वेद भव्य दिव्य असा पारायण सोहळा संपन्न होत आहे. फिरता अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होत असून महाराष्ट्रातील थोर संत मंडळींची कीर्तन व प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता मंगळवार दिनांक 28 एप्रिल रोजी ह. भ. प. वसंत महाराज थोरमले यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. तरी पंचक्रोशीतील व सर्व भाविक भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

----------------------------------

मुलगा श्रीकांत याच्याशी दि. 26 एप्रिल रोजी दुपारी 3:30 वाजता जोला येथील शेतातील घरासमोर विवाह करण्यात येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसाना मिळाली होती.त्या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या पोलिस उपनिरीक्षक रेडेकर, श्रीमती जाधव, पोलिस हेडकॉन्स्टेबल येवले, पोलिस कॉन्स्टेबल जाधव यांनी छापा टाकून त्यांचा बालविवाहाचा प्रयत्न उधळून लावला. तसेच त्या अल्पवयीन मुलीचा जबाब घेतला असता तिने दि. 26 एप्रिल रोजी तिचा साखरपुडा झाल्याचे सांगितले. दरम्यान केज पंचायत समितीच्या महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती लटपटे यांच्या आदेशाने अंगणवाडी सेविका सविता विष्णु सारुक यांच्या तक्रारीवरुन केज पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीचे आई- वडील सुनिता भगवान करंजकर आणि भगवान शिवाजी करंजकर, भावी नवरदेव श्रीकांत महादेव जाधव व त्याचे आई-वडील कौशल्या महादेव जाधव आणि महादेव नरहरी जाधव या पाच जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-------------------------------------

सूर्यवंशी यांचे गजानन ॲग्रो एजन्सी या कृषी सेवा केंद्राला अचानक आग लागून दुकानातील किटक नाशक, तन नाशक, विद्राव्य खते, लिंबोळी पेंड आणि दुकानातील फर्निचर असे मिळून 12 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.तसेच या आगीमुळे त्यांच्या शेजारी असलेले खंडेश्वर पशु खाद्य ट्रेडर्स, प्रकाश मुंडे यांचे मोटार व इलेक्ट्रिक साहित्य दुरुस्तीचे दुकान आणि नारायण नेहरकर यांचे चहाच्या दुकानासह दत्ता देशमुख यांचे दत्तात्रय फोटो स्टुडिओला सुद्धा या आगीमुळे नुकसान पोहोचले आहे. मोटार दुरुस्ती, चहाचे हॉटेल आणि पशु खाद्याचे मोठे नुकसान झाले आहे. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती :- या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त होत आहे.माहिती मिळताच बंब घटनास्थळी :- आगीची माहिती मिळताच केज नगरपंचायतीचा अग्निशामक बंब घटनास्थळी हजर झाला आणि कर्मच्यांनी आग आटोक्यात आणली.

--------------------------------------



हॅलो बीड
परळी संघर्षनेता
मंगळवार दि. 28 एप्रिल 2026


# परळीमध्ये अल्पसंख्याक मुलींसाठी बांधलेले वसतिगृह बंदच विद्यार्थिनींचे नुकसान प्रशासनाचा दुर्लक्षा. जमीर शेख



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी विशेष वसतिगृह (Hostel) योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, शीख व पारशी समाजातील गरजू विद्यार्थिनींना सुरक्षित निवास, अन्न व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. मात्र परळी शहरात या योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या दोन स्वतंत्र वसतिगृह इमारती अद्यापही सुरू करण्यात आलेल्या नाहीत, अशी गंभीर बाब समोर आली आहे.

सदर वसतिगृहांमध्ये 70 टक्के जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी राखीव असून 30 टक्के जागा इतर प्रवर्गासाठी असतात. तसेच 10 वी, 12 वी नंतर पदविका, आयटीआय किंवा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. वसतिगृहात अभ्यासिका, संगणक कक्ष, चांगल्या प्रतीचे अन्न व सुरक्षिततेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील विद्यार्थिनींना प्रवेश शुल्कातही सवलत दिली जाते.

असे असतानाही परळी येथे तयार असलेल्या दोन वसतिगृह इमारती वापरात न आणल्यामुळे अनेक गरजू मुलींना शिक्षणासाठी आवश्यक असलेली निवास व्यवस्था मिळत नाही. यामुळे विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या महत्त्वाच्या पान 3 वर

# शेतात काम करत असताना अचानक उष्माघाताचा त्रास; खुरपणी करताना महिला शेतकऱ्याचा मृत्यू



सध्या संपूर्ण जुन्नर तालुक्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून, या वाढत्या उष्णतेचा एक भीषण बळी निमगाव सावा येथे गेला आहे. शेतात काम करत असताना अचानक उष्माघाताचा त्रास झाल्याने सौ. रुपाली भाऊ गाडगे (वय अंदाजे 40) या महिला शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे निमगाव सावा गावासह संपूर्ण परिसरामध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निमगाव सावा येथील गावमाळा/ माडीमळा परिसरातील रहिवासी असलेल्या सौ. रुपाली गाडगे या आज, सोमवार दि. 27 एप्रिल रोजी सकाळी आपल्या शेतात खुरपणीचे काम करत होत्या. सकाळी 11:45 च्या सुमारास उन्हाची तीव्रता अधिक असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. उष्माघाताचा तीव्र झटका बसल्याने त्या जागीच कोसळल्या. त्यांना तातडीने मदत मिळेपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. एका कष्टकरी माऊलीचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने गाडगे कुटुंबावर डोंगर कोसळला आहे. मृत रुपाली गाडगे यांच्या पश्चात पती, पान 3 वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना हा आपल्या प्रगतीचा आधारस्तंभ - डॉ. भरत मुंडे

## टोकवाडी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



परळी वैजनाथ, प्रतिनिधी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना हा आपल्या प्रगतीचा आधारस्तंभ आहे. आपण सर्वांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करूया असे आवाहन डॉ. भरत मुंडे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जय हिंद सामाजिक प्रतिष्ठानचा सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती टोकवाडी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावात मिरवणुक दरम्यान उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन जय हिंद सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने मोफत पाण्याच्या बॉटल चे वाटप करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना आपल्या भाषणात डॉ. भरत मुंडे यांनी कविता सादर करत आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी यावेळी सांगितले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर पान 3 वर

# बाबासाहेबांनी बहुजनांच्या उद्धारासाठी शिक्षणाचे शस्त्र दिले - रानबा गायकवाड

## कार्यकर्त्यांनी मरगळ झटकून लावावी - प्रा.दासू वाघमारे



परळी प्रतिनिधी. भारतीय संविधानाच्या माध्यमातून या देशातील उपेक्षित गावकुसाबाहेरच्या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी बाबासाहेबांनी शिक्षण कायद्याने शिक्षण सक्तीचे केले होते. परंतु बहुजनांना बाबासाहेबांनी दिलेले शिक्षणाचे हे शस्त्र हिरावून घेण्याचा प्रयत्न होत आहे. हा कुटील डाव बहुजन समाजाने हाणून पाडावा असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले. ते परळी तालुक्यातील इंजेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या महामानव,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

तालुक्यातील मौजे इंजेगाव येथे विश्वरत्न डॉ. पान 3 वर

# पोहनेर सरपंच प्रकरणात अपात्रतेचे अपील नामंजूर; ॲड. सय्यद शाकेर यांच्या भक्कम युक्तिवाद



परळी : तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहनेर ग्रामपंचायतीच्या सरपंचांविरोधात दाखल करण्यात आलेले अपात्रतेचे अपील अखेर नामंजूर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी साहेब बीड यांनी सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर अर्जदारांचे आरोप अपुरे व असिद्ध ठरवत हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

सदर प्रकरणात सरपंच कुरेशी रुखयाबी यांनी सरपंच पदाकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी त्यांनी अपत्याबाबत चे स्वयंघोषणापत्र चुकीचे बनावट दाखल केलेले होते असा आरोप करत त्यांनी अपत्या बाबत ची माहिती लपवून निवडणूक प्रक्रियेदरम्यान चुकीची माहिती पान 3 वर

# युनिक क्युरियस किड्स चा युनिक समर कॅम्प उत्साहात संपन्न



परळी वैजनाथ, दरवर्षीप्रमाणे यंदाही “युनिक समर कॅम्प” मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. या समर कॅम्पला पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कॅम्पमध्ये लिमिटेड 100 चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कॅम्पदरम्यान दररोज विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कॅम्पमधील प्रमुख उपक्रम:

सकाळी विविध श्लोक, गणपती स्तोत्र व प्रार्थना म्हणण्याचा सराव

तज्ञ योगा ट्रेनरमार्फत योगासने व आरोग्यविषयक मार्गदर्शन

विशेष पाहुण्यांकडून श्लोक व संस्कार शिक्षण

स्टोन पेंटिंग, लिपन आर्ट, निडल आर्ट, टाय-डाय आर्ट अशा सर्जनशील कला

विविध प्रकारच्या रंगकाम (कलरिंग) ॲक्टिव्हिटीज पान 3 वर

# जिजाबाई शंकरराव जगतकर यांचे निधन



अंबाजोगाई /परळी -:येथील आनंद गॅस सर्व्हिसचे प्रोपरायटर तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड. अनंतराव जगतकर यांच्या मातोश्री श्रीमती जिजाबाई शंकरराव जगतकर (वय-98) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी 11 वाजता परळी येथील शांतीवन स्मशानभूमी काळराञी मंदीर परळी येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले,एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# मागासवर्गीयांवरील हल्ल्यांबाबत केज पोलिसांवर निष्क्रियतेचा आरोप

## मंगळवारी जनआक्रोश मोर्चा-डॉ.जितेंद्र ओव्हाळ



केज : मागासवर्गीय महिलांवर वारंवार होणाऱ्या मारहाणीच्या घटनांमध्ये पोलीस यंत्रणा बघ्याची भूमिका घेत असल्याचा गंभीर आरोप करत, केज येथे मंगळवारी (दि. 28 एप्रिल 2026) जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली.

या संदर्भात पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, गावखेड्यात मागासवर्गीय समाजालाच लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. महिलांवर थेट हल्ले होत असताना गुन्हे दाखल करण्यास विलंब होतो, तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (डउ/डढ -लीं) गुन्हे पान 3 वर

# अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेले; गुन्हा दाखल



केज : तालुक्यातील एका गावातून एका 16 वर्षाच्या अल्पवयीन मुलीला एका भिन्न धर्मीय तरुणाने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेले आहे. 23 एप्रिल रोजी एका मुलीचे आई-वडील हे नातेवाईकांच्या कार्यक्रमासाठी नेकनुर येथे गेले होते. रात्री आई-वडील घरी आल्या नंतर त्यांना त्यांची मुलगी घरी नसल्याचे निदर्शनास आल्या नंतर त्यांनी मुलीचा शोध घेतला. मात्र मुलगी आढळून आली नाही.

त्यानंतर मुलीच्या भावाच्या मोबाईल नंबरवर त्यांना अंबाजोगाई तालुक्यातील एका गावच्या ग्रामपंचायत सदस्याने कळविले की, बेपत्ता असलेल्या मुलीला घेऊन, एक पान 3 वर

# कीर्तनाला जाणाऱ्या रिक्षालचालकासह कुटुंबीयांना मारहाण

## नेकनूरमध्ये किरकोळ कारणातून घडलेला प्रकार; दगडफेकीनंतर पोलिसांचा सौम्य लाठीमार



नेकनूर : वै. व्यंकटस्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरु झालेल्या सप्ताहात कीर्तनाला निघालेल्या रिक्षाचालकासह त्याच्या कुटुंबीयांना मारहाण झाल्याची घटना नेकनूरमध्ये घडली. शनिवारी रात्री नेकनूरच्या बसस्थानकासमोर दुचाकीस्वाराला रिक्षाचा कट बसला या शुल्लक कारणातून दुचाकीस्वार रिक्षाचालकाला अडवून मारहाण करू लागला या रिक्षात बसलेल्या महिला मारहाण होत असल्याचे दिसताच काहींनी धाव घेतली यांनतर हा वाद पान 3 वर

# सन 2025 च्या पीक विम्यासाठी किसान सभेची तीव्र निदर्शने.




माजलगाव ( अनंत घडसिंगे ) : तालुका किसान सभेच्या वतीने दिनांक 27/ 4/ 2026 सोमवार रोजी वेगवेगळ्या मागण्या संदर्भात माजलगाव तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी घोषित केल्याप्रमाणे सन 2025 चा खरीप पिक विमा दिलेला नाही. त्यामुळे किसानसभा संघटनेच्या वतीने संपूर्ण बीड जिल्ह्यात आंदोलन ठेवण्यात आलेले होते. त्याचाच भाग म्हणून माजलगाव किसान सभा तालुका कमिटीच्या वतीने माजलगाव तहसीलवर तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात आली. यावेळी दिलेल्या निवेदनात सन 2025 चा खरीप पान 3 वर

# श्री संत जगमिञ नागा मंदिर येथे फिरता अखंड हरिनाम सप्ताह | हरिनामाचा गजर


- फिरता अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या ह. भ. प. वसंत महाराज थोरमले यांच्या कीर्तननाने आज होणार सांगता



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : श्री संत महान तपस्वी जीवनेश्वर काळुबाबा व आद्यग्रामदैवत श्री कालभैरवनाथ कृपेने व वैकुंठवासी प.पू गुरुवर्य ह भ प बबन महाराज यांच्या प्रेरणेने व ह. भ. प. वसंत महाराज थोरमले (उत्तराधिकारी) यांच्या मार्गदर्शनाने फिरता अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होत असून महाराष्ट्रातील थोर संत मंडळींची कीर्तन व प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता मंगळवार दिनांक 28 एप्रिल रोजी ह. भ. प. वसंत महाराज थोरमले यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. तरी पंचक्रोशीतील व सर्व भाविक भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. पान 3 वर

# केज तालुक्यात अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला

## मुलीचे आई वडील, भावी जावई आणि सासू सासऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल.



केज :- केज तालुक्यात जोला येथे एका 17 वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिस घटनास्थळी हजर झाले. त्यांनी तो बालविवाह रोखला. या प्रकरणी त्या अल्पवयीन मुलीचे आई-वडील आणि ज्या मुलासोबत त्या मुलीचे लग्न उरकण्याचा डाव होता त्या मुलाच्या आई-वडीलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज तालुक्यातील जोला येथील सौ सुनीता व भगवान करंजकर या दांपत्याची 17 वर्ष वयाची अल्पवयीन मुलगी प्रतिमा करंजकर हिचा पिंपळगाव ता. केज येथील सौ. कौशल्या व महादेव जाधव यांचा पान 3 वर

# केज शहरातील मंगळवार पेठेत पाच दुकाने आगीत भस्मसात



केज :- केज शहरातील मंगळवार पेठेतील पाच दुकानांना आग लागून खत आणि बी बियाण्यांच्या दुकानासह मोटार रिवाइंडिंग, पशु खाद्य आणि हॉटेलसह इतर तीन दुकाने जळून मोठे नुकसान झाले. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आज 11:30 वाजता मंगळवार पेठ केज येथील अनिल अशोक पान 3 वर